# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६८७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/१०/२०१६

**१) महीलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक १७/१०/२०१६ रोजी १७.३० वा. दर. यातील फिर्यादी शेतशिवारात कामा निमीत्तानी हजर असतांना यातील दोन अनोळखी आरोपी इसमानी फौजदारी बळाचा वापर करुन फिर्यादी सोबत अश्लिल कृत्य करण्याचा व लैगिक अनुकह करण्याची मागणी करुन तिचा विनयभंग केला व तसेच आरोपीने झटापटी दरम्यान फिर्यादी खाली पडुन तिचे डोक्याचे वर व नाकाला मार लागुन किरकोळ जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३५४(अ)(१)(२),३२३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोयर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**२) घरात अनाधीकृतपणे प्रवेश करुन विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक १७/१०/२०१६ रोजी २२.०० वा. दर. यातील फिर्यादी ही आपल्या मुलाबाळासह घरी झोपली असता यातील आरोपीने फिर्यादीचे घरी अनाधीकृतपने किचन रुम मध्ये प्रवेश करुन फिर्यादीस हाताने ईशारा करुन बोलवितांना दिसला तेव्हा फिर्यादी ही जोराने ओरळली असता आरोपी हा मागचे दाराने पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५२,३५४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. वानखेडे पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) अज्ञात ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकल चालक जखमी . :-**

दिनांक १८/१०/२०१६ रोजी ०३.४५ वा. दर. यातील फिर्यादी नितेश चुन्नीलाल शहारे वय २७ वर्ष, रा. प्लॉट नं. १५४ राजगुरु नगर टेकानाका नागपुर हा नागपुर कडुन आपली मोटार सायकल क्र. एमएच २० एच ७१९६ ने गोंदिया कडे जात असतांना गोंदिया कडुन येणा-या यातील आरोपी अज्ञात ट्रक चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपने, भरधाव वेगाने चालवुन मोटार सायकलला जाम टर्निग येथे धडक देवुन पळुन गेल्याने व फिर्यादीला किरकोळ जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४,१३४(ब),१८७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. केने पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**४) अवैध दारु अडयांवर धाडी . :-**

दिनांक १८/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. कारधा, करडी व गोबरवाही येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन ४२ लिटर हातभटटी दारु कि. २,७००/-रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.